**अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना.**

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:मासाका-२००३/प्र.क्र.१९/ विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : २७ फेब्रुवारी, २००४

**प्रस्तावना:-** विविध संस्थांमार्फत सहकारी तत्वावर चालविण्यात येणा-या उद्योग धंद्यांच्या माध्यमातून राज्यातील लोकांचा आर्थिक विकास होण्यास फार मोठी मदत झाली आहे. परंतु सहकार क्षेत्रांत अनुसूचित जातीच्या घटकांमार्फत चालविण्यात येणारे उद्योगधंदे नगण्य आहेत. सहकाराच्या माध्यमातून अनुसूचीत जातीच्या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे काळाची गरज आहे. दुर्बल घटकांना सहकार क्षेत्रांत वाव मिळवून देऊन त्यांना विकासाच्या संधी मिळवून देणे आवश्यक आहे. कारण सध्या अनुसूचित जातीमध्ये बेरोजगारांची संख्या फार मोठी असून ती वरचेवर वाढत आहे. शासकीय/निमशासकीय सेवेत पद भरतीवर मर्यादा आली आहे. त्यामुळे बेरोजगारांना उपजीवीकेचे साधन उपलब्ध करुन देणे अनुसूचित जातीच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना वित्तीय संस्था दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन देण्यास फारशा उत्सूक नसतात. त्यामुळे मागासवर्गीयांना सहकारी तत्वावर उद्योगधंदे उभे करणे अडचणीचे झाले आहे. म्हणून सहकार क्षेत्रांतर्गत कमीत कमी खर्चाचे उद्योगधंदे उभारण्यासाठी कर्ज/भागभांडवल उपलब्ध करुन देण्याच्या शक्यतेवर विचार करण्यात आला. जेणेकरुन मागासवर्गीय बेरोजगार युवकांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देता येईल. अनुसूचित जातीच्या यंत्रमाग सोसायटया, निटींग, गार्मेंटस, कापड प्रोसेसिंग, युनिट शेतीमालावर प्रक्रीया करणा-या संस्था, साखर कारखाने, खांडसरी कारखाना रुपांतरीत करणे (conversion & modernisation ) व तत्सम उद्योगांना शासनामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध होणे गरजेचे आहे. सध्या विशेष घटक योजनेमधून अनुसूचित जातीच्या सहकारी सूतगिरण्यांना कर्ज व भागभांडवल मंजूर करण्यात येते. त्याच धर्तीवर प्रकल्पमूल्य रुपये ५.०० ते ७.०० कोटीच्या मर्यादेत वर नमुद केलेल्या उद्योगधंद्यांसाठी अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना विशेष घटक योजनेमधून दीर्घ मुदतीचे कर्ज व भागभांडवल मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-** वरील बाब विचारात घेता अनुसूचित जातीच्या यंत्रमाग सोसायट्या, निटिंग गार्मेंटस्, कापड प्रोसेसिंग युनिट, शेतीमालावर प्रक्रीया करणा-या सहकारी संस्था, साखर कारखाने, खांडसरी कारखाना रुपांतरीत करणे, व तत्सम उद्योगांना शासनामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यास शासन मंजूरी देत आहे. या योजनेचे स्वरुप व त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

**योजनेचे स्वरुप :**

अनुसूचीत जातीच्या सहकारी संस्थांना द्यावयाच्या अर्थसहाय्याचे सूत्र खालीलप्रमाणे राहील (प्रकल्प मुल्याच्या)

| | | |
|---|---|---|
| (१) | सहकारी संस्थेचा स्वतःचा हिस्सा | ५% |
| (२) | सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल मंजूर करणे | ३५% |
| (३) | विशेष घटक योजनेमधून दीर्घ मुदतीचे कर्ज | ३५% |
| (४) | वित्तीय संस्थांकडून दीर्घ मुदतीचे कर्ज | २५% |
| | एकुण | १००% |

**योजनेच्या अटी व शर्ती**

१) या योजनेअंतर्गत केवळ अनुसुचित जातीच्या नोंदणीकृत सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र ठरतील.

२) विशेष घटक योजनेच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक ७०% अनुसूचित जातीचे असावे. सहकारी संस्थांचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरु झाल्यानंतर त्यामधील कर्मचारीवर्ग व कामगारवर्गही ७०% अनुसूचित जातीचा असावा.

३) विशेष घटक योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्जदार संस्थां हया अनुसूचित जातीच्या असाव्या व त्यांना कर्ज व भागभांडवल विशेष घटक योजनेमधून सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल.

४) अर्जदार सहकारी संस्थांनी शासनास सादर केलेल्या प्रकल्प मुल्याच्या किमान ५% भागभांडवल जमा केल्यानंतर त्यांना शासकीय भागभांडवल / दिर्घ मुदतीचे कर्ज मिळण्यास पात्र समजण्यात यावे. प्रकल्पमूल्य मर्यादा (१) ॲग्रीकल्चर फायनान्स कार्पोरेशन नवी दिल्ली, (२) दत्ताजी टेक्नीकल इन्स्टीटयुट इचलकरंजी अथवा (३) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मुंबई. (मिटकॉन) अथवा संबंधित वित्तिय संस्था या पैकी कोणत्याही एका संस्थेने निश्चित केल्याप्रमाणे मात्र कमाल ५ ते ७ कोटी (व्यवसायानुरुप) असावी. अर्जदार संस्थांनी यापैकी कोणत्याही एका संस्थेकडून प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावा.

५) अर्जदार संस्थेने एकूण प्रकल्प मूल्याच्या ५% एवढया निधीची उभारणी स्वतः केल्यानंतर ३५% भाग भांडवल व ३५% दीर्घ मुदतीचे कर्ज विशेष घटक योजनेअंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल. सहकारी संस्थांनी प्रकल्प खर्चाच्या २५% अर्थसहाय्य कर्ज वित्तीय संस्थांकडून प्रथम उपलब्ध करुन घ्यावे. त्यानंतर शासनाकडून भाग भांडवल / दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे.

६) सहकारी संस्थांनी प्रकल्प उभारतांना संनियंत्रण समिती गठीत करावी व त्यामध्ये शासनाचा म्हणजेच सामाजिक न्याय विभागाचा आणि/अथवा सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा वर्ग १ श्रेणीतील एक प्रतिनिधी राहील. 6

७) सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर शासन नियुक्त करेल असा सामाजिक न्याय विभागाचा एक अधिकारी संचालक म्हणून राहील.

८) सहकारी संस्थांकडे प्रकल्प उभारणीसाठी प्रकल्प अहवालात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक तेवढी जागा असली पाहिजे.यावर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा. याबाबत सक्षम अधिका-याने प्रमाणपत्र दिले असले पाहिजे, आवश्यक असेल तेथे बिगर शेती परवाना जोडावा. बिगर शेती परवान्याची मुदत संपली असल्यास त्यावर मुदतवाढीचे आदेश सक्षम अधिका-याकडून घेण्यात यावे.

९) सहकारी संस्थांनी शासन मान्य यंत्रसामग्री पुरवठादाराशी यंत्रसामग्री खरेदीबाबत करार करण्यापूर्वी सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून यंत्रसामग्री पुरवठादार निश्चित करुन घ्यावा.

१०) प्रकल्प उभारणीकरिता कमाल ५२ आठवड्याचा कालावधी असावा सहकारी संस्थांना निधीच्या उपलब्धतेप्रमाणे निधी मंजूर करण्यात येईल.

११) शासनाकडून जे दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वितरीत केले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत जिल्हाधिकारीकडून घेण्यात यावे.व त्यानंतर पुढील हप्ता वितरीत करण्यात यावा.

१२) कर्जाची परतफेड संस्थेला प्रकल्प मुल्याच्या ९० टक्के निधी अदा केल्यानंतर २ वर्षांनी सुरु करण्यात यावी. कर्ज परतफेडीचा कालावधी ६ वर्षाचा असावा. वित्तीय संस्थांच्या कर्जाची (मुद्दल) वसुली प्रथम ४ वर्षाच्या आंत २४ समान त्रैमासिक हप्त्यांत करण्यात यावी व नंतर व्याजाची वसुली ८ समान त्रैमासिक हप्त्यांत करण्यात यावी.कर्ज वसुलीची जबाबदारी संचालक समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. कर्ज वसुलीचा विलंबावधी हा वित्तिय संस्थाप्रमाणे असावा.

१३) व्याजाचा दर, दंडनीय व्याज इत्यादि वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्यानुसार राष्ट्रीय कृषी व औद्योगिक विकास बँक, नवी दिल्ली (NABARD) व्दारा निश्चित केल्याप्रमाणे राहील.

१४) लाभार्थी संस्थेने संचालक, समाज कल्याण व संबंधीत सहकारी संस्थांचे अध्यक्ष यांच्या नांवे राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त खाते उघडावे.व त्यानी संयुक्तपणे कार्यान्वित (ऑपरेट) करावे.

१५) ज्या कामाकरिता दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भाग भांडवल मंजूर केले आहे त्याच कामाकरिता सहकारी संस्थेने त्याचा वापर करावा. निधीचा गैरवापर होत असल्याचे दिसून आल्यास दंडात्मक व्याज दरासह महसुली थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१६) प्रकल्पाचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष अनुसूचित जातीचा असावा.

१७) लाभार्थी संस्थेच्या प्रकल्पाच्या संचालक मंडळावर/कार्यकारिणीवर ११ सदस्य असतील त्यापैकी एक सदस्य अमागासवर्गीय व उर्वरित सर्व सदस्य अनुसुचित जातीचे असावे.

१८) लाभार्थी सहकारी संस्थेच्या संयुक्त खात्यात जमा झालेल्या रक्कमेवरील व्याजाची रक्कम लाभार्थी संस्थेस वापरण्यास परवानगी द्यावी. त्यावर शासनाचा हक्क राहणार नाही.

१९) मंजूर करण्यात आलेले दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भाग भांडवलावरील व्याजाची आकारणी संस्थेला मंजूर करण्यात आलेला निधी त्यांच्या संयुक्त खात्यात जमा झाल्याच्या दिनांकापासून करावी.

२०) लाभार्थी संस्थेची जमीन संस्थेच्या नांवे असल्याचा पुरावा म्हणून संस्थेच्या नांवाचा ७/१२ चा उतारा आणि कायदेशीर खरेदीपत्राची सत्यप्रत प्रस्तावासोबत जोडावी. संचालक समाजकल्याण यांनी तशी खात्री करुन घ्यावी.

२१) कर्ज अथवा भाग भांडवलाची उचल केल्यानंतर त्याची व्याजासह परतफेड होईपर्यंत संपूर्ण प्रकल्प (जमीन यंत्रसामग्री, आणि प्रकल्पाची इतर मालमत्ता इत्यादी) शासनाकडे गहाण ठेवावी. गहाण खताचा प्रचलीत कायद्यानुसार करारनामा करावा. गहाणखतावर पहिला हक्क शासनाचा व दुसरा हक्क वित्तीय संस्थेचा राहील. गिरणीच्या संचालक मंडळाला थकीत कर्जासाठी वैयक्तीकरित्या जबाबदार धरण्यात यावे.

२२) शासन (वित्त विभाग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग उर्जा व कामगार विभाग यापैकी संबंधित विभाग) इतर सहकारी संस्थांना कर्ज/भागभांडवल मंजूर करते वेळी ज्या अटी व शर्ती घातल्या जातात, त्या सर्व अटी व शर्ती याप्रकरणी लागू राहतील.

२३) प्रकल्पाच्या सुनियोजित उभारणीसाठी शासन आवश्यकतेनुसार ज्या अटी व शर्ती वेळोवेळी विहीत करेल त्या अटी व शर्ती या प्रकरणी लागू राहतील.

7

२४) सहकारी खांडसरी कारखाने आणि सहकारी साखर कारखाने यांच्याबाबतचा अहवाल, आयुक्त, साखर, महाराष्ट्र राज्य, पुणे व शेतीमाल सहकारी प्रक्रीया संस्था यांच्याबाबतचा अहवाल, सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून छाननी करुन घेण्यात यावा.तसेच सूत गिरणी आणि निटींगच्या प्रकल्पाला संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य,नागपूर यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक राहील.

२५) वरील अटी व शर्तीनुसार प्रस्ताव तपासून योग्य आहे किंवा नाही, याबाबत अभिप्राय देण्याची संपूर्ण जबाबदारी संचालक, समाज कल्याण यांची राहील.

२६) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या मार्फत विहीत पध्दतीने अर्ज करणा-या संस्थांचाच कर्ज / भाग भांडवल मंजुरीसाठी विचार करण्यात येईल.

२७) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या सहकारी संस्थांच्या मुख्य प्रवर्तकाने पूर्वी एखाद्या प्रकल्पासाठी शासनाकडून अर्थसहाय्य घेऊन असा प्रकल्प पूर्णत्वास न नेता तो विविधर कारणास्तव मोडीत काढला असल्यास अशा मुख्य प्रवर्तकाने दुसरा प्रकल्प उभारण्याकरीता प्रस्ताव सादर केल्यास त्यास मान्यता देण्यात येऊ नये.

२. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २५२/०४/व्यय-१४, दि. २७-२-२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मंगला हरीदास)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
आयुक्त, साखर महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान सचिव, (वस्त्रोद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (सहकार),सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.